D7
14/7/22
4:20

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १४/०७/२०२२

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

केंद्र सरकारच्या केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग मंत्रालयाने दिनांक १२ मे, २०२२ नुसार मुर्त्यांचे विसर्जन करणेबाबत सुधारीत मार्गदर्शक तत्वे निर्धारीत केलेली आहेत. सदर मार्गदर्शक तत्वांमध्ये प्लास्टर ऑफ पॅरीस (पि.ओ.पि.) पासुन तयार करण्यात येणा-या मुर्त्यांचा वापर करू नये. तथापि, पर्यावरणपुरक वस्तु व विघटनशील वस्तुंपासून उदा. शाडूची माती, कागदाचा लगदा व इतर वस्तुंपासून तयार केलेल्या मुर्त्यांचा वापर करावा असे नमुद आहे.

आगामी सण/उत्सव लक्षात घेता प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांचेकडील प्राप्त निर्देशानुसार तसेच मा. आयुक्त, डॉ. राजा दयानिधी व अतिरिक्त आयुक्त, डॉ. करूणा जुईकर यांच्या मार्गदर्शनाखाली उल्हासनगर शहरातील मुर्तीकार/मुर्ती कारखानदार यांची महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात दिनांक १२/०७/२०२२ रोजी सायं.५.०० वा. बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये पर्यावरण विभागाचे उपायुक्त (पर्यावरण) डॉ. सुभाष जाधव, श्री. बाळासाहेब कुकाडे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण, श्री. आनंद केर्लीकर, अधिकारी, MPCB तसेच पर्यावरण विभागाच्या विभागप्रमुख सौ. विशाखा सावंत उपस्थित होत्या.

सदर बैठकीत उपस्थित मुर्तीकारांना प्लास्टर ऑफ पॅरीस (पि.ओ.पि.) पासुन मुर्त्या तयार करू नये तसेच प्लास्टर ऑफ पॅरीस (पि.ओ.पि.) पासुन तयार केलेल्या (Readymade) मुर्त्यांची विक्री करू नये याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी श्री. बाळासाहेब कुकाडे, यांनी मार्गदर्शन केले.

तथापि, केंद्र शासनाच्या निर्देशानुसार स्वातंत्र्याचा अमृत महोत्स्व साजरा करण्याच्या अनुषंगाने हर घर तिरंगा हे अभियान सर्वत्र राबवावयाचे असल्याने याबाबत जनजागृती करणेच्या अनुषंगाने दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या सप्ताहात सर्व उपस्थित मुर्तीकार यांनी आपल्या घरावर तसेच आपल्या मुर्ती कारखाने/दुकाने येथे स्वयंस्फुर्तीने तिरंगा /वज खरेदी करून फडकवावा, तसेच ध्वजाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आवाहनदेखील डॉ. सुभाष जाधव, उपायुक्त (पर्यावरण) यांनी याप्रसंगी केले.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका